**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक मातंसं०६५/प्र.क्र.१/२०१८**
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दि.१७ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u>- १. मा.तं.सं. शा. नि. क्र. डीआटी/फाईल-०३/३३६, दि. ०१.०४.२००६

**<u>प्रस्तावना</u>**

महाराष्ट्र शासन राज्यातील डिजिटल इंडिया प्रोग्रामचे उद्दिष्ट साकार करण्यासाठी सक्रिय कृती करीत आहे. भारत नेट प्रकल्पाअंतर्गत सरकार राज्यातील सर्व स्तरांवरील ग्रामपंचायतींना हाय स्पीड इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या उपलब्धतेची खात्री करणार आहे. महाराष्ट्रातील ९३% नागरिक दुरध्वनी वापरत आहेत. संपुर्ण देशात दुरध्वनी वापरकर्त्यांची संख्या महारष्ट्रात सर्वाधिक आहे. या बाबीचा उपयोग नागरिकांना नागरिक केंद्रित सेवा देण्यासाठी करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे, जेणेकरून नागरिकांना सरकारी कार्यालयात जावे न लागता घरीच आरामशिर सेवा मिळवता येऊ शकेल. माहिती तंत्रज्ञान विभागाने ई-गव्हर्नन्स सोबतच एम-गव्हर्नन्स वर भर देऊन नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या सर्व एकत्रीत सेवा मोबाईल इंटरफेसवर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. या सर्व उपक्रमांसाठी राज्यात दूरसंचाराचे भक्कम पायाभूत नेटवर्क, उत्कृष्ट प्रतीच्या सेवेसह असणे आवश्यक आहे.

दुरसंचार सेवा प्रदाता संस्था आणि उद्योग संघटनांनी राज्यातील दुरसंचाराच्या पायाभूत सुविधा निर्माणास अडसर ठरत असलेल्या काही मुद्द्यांवर वेळोवेळी शासनाचे लक्ष केंद्रित केले आहे.

सद्यस्थित ऑप्टीकल फायबर केबलच्या मार्गाच्या हक्काची परवानगी व मोबाईल टॉवर्स, मास्ट, सेल यांच्या उभारणीची परवानगी या दोन बाबींसाठी दोन वेगवेगळे नियमावलींचे संच अनुक्रमे माहिती तंत्रज्ञान संचालनालय व नगर विकास विभागामार्फत संचलीत करण्यात येत आहेत. एकापेक्षा अधिक विभाग व संस्थांना परवानग्यांसंबंधित कामकाज हाताळावे लागल्याने परिणामस्वरूप कामाची न टाळता येणारी पुनरावृत्ती होते व यात दोन्ही पक्षांचा कालापव्यय होतो. अर्जदारास एका अर्जासाठीसुध्दा विविध प्रमाणपत्रे, रकमेची अदायगी, परवानगी, या बाबींसाठी विविध कार्यालयांकडे चकरा माराव्या लागतात. परवानगीची प्रकरणे हाताळणाऱ्या विभागांची ही बाहुल्यता संपुष्टात आणून माहिती तंत्रज्ञान संचालनालयास दुरसंचाराच्या पायाभुत सुविधांची उभारणी व देखभाल या बाबीसाठी एकमेव संपर्क कार्यालय म्हणून नामनिर्देशित करणे इष्ट आहे.

भारत सरकारच्या संप्रेषण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने दि.१५.११.२०१६ रोजीच्या अधिसुचनेन्वये भारतीय टेलेग्राफ मार्गाचा हक्क अधिनियम. २०१६ जारी केले आहेत. या नियमान्वये दुरसंचार सेवा प्रदाता संस्थांनी करावयाच्या अर्जाची पध्दती, परवानगी देण्यापुर्वी संबंधित प्राधिकरणाने तपासावयाचे मुद्दे, सदर काम पुर्ण करतांना परवानगी धारक संस्थेने पाळावयाची कर्तव्ये. आणि जमिनीखालून तसेच जमिनीवरून जाणाऱ्या दुरसंचाराच्या पायाभूत सुविधेच्या कामावर देखरेख करण्याचे संबंधित प्राधिकरणांचे प्राधिकार यांबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. एक खिडकी पधतीचा अवलंब करून केंद्र शासनाच्या धोरणाशी सुसंगत धोरण निर्मीती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

राज्यातील दुरसंचाराच्या पायाभूत सुविधांची उभारणी व देखभाल (दुरसंचार मनोरे, मायक्रो सेल्स, मास्ट्स, ऑप्टीकल फायबर केबल या आणि यांसारखे उपक्रम) या संदर्भात माहिती तंत्रज्ञान विभाग व इतर विभागांनी वेळोवेळी निर्गमित केलेली धोरणे व सुचना या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत.

माहिती तंत्रज्ञान संचालनालय हे ऑप्टीकल फायबर केबल व मोबाईल टॉवर्स संबंधित दुसंचाराच्या पायाभूत सुविधांचे निर्माण व देखभाल यांच्या परवानगीसाठी एकमेव संपर्क कार्यालय म्हणून नेमण्यात येत असून प्रधान सचिव (मातं) हे संपर्क अधिकारी असतील.

## अ. दुरसंचार मनोरा (Telecom Tower) धोरण

२) विकास योजना अथवा प्रादेशीक योजना यांच्या संबंधित विकास नियंत्रण नियमनात जमिन वापर विषयक तरतुदींमध्ये काहीही नमूद असले तरीही या अनुषंगाने नगर विकास विभागाने तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांची पुर्तता होत असल्यास दूरसंचार सेल साइट (टीसीएस) / बेस स्टेशन (बीएस) / मोबाईल टॉवर (यापुढे "मोबाइल टॉवर" म्हणून संबोधण्यात येतील) वापर खालील बाबींच्या अधीन राहून अनुज्ञेय असतील. :-

अ) कोणत्याही विकास योजना किंवा प्रादेशिक योजना मध्ये निर्धारित सर्व जमीन वापर प्रयोजने

ब) कोणत्याही डीपी किंवा आरपीमध्ये बिना बांधकाम करण्यायोग्य आरक्षणासाठी ज्या जागा नियुक्त केल्या आहेत त्या अटीनुसार, अशा मोबाइल टॉवरच्या स्थापनेसाठी जास्तीत जास्त स्वीकार्य क्षेत्र आरक्षित जागेच्या क्षेत्राच्या ५% किंवा १०० चौ.मी.पेक्षा जास्त असणार नाही. यांपैकी जे कमी आहे ते असेल, आणि आरक्षित जागेच्या एका कोपऱ्यात स्थित असेल

क) मंजूर केलेल्या आराखडयामधील मोकळ्या जागा / मनोरंजनाच्या खुल्या जागा / मनोरंजनाची मैदाने म्हणून घोषित असलेल्या सर्व जमिनी, जेथे मोबाईल टॉवरच्या स्थापनेची परवानगी केवळ संबंधित नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या ना हरकत प्रमाणपत्रासह किंवा कायदेशीर धारक / प्लॉट धारकांच्या एकूण संख्येच्या 70% धारकांच्या सहमतीने देय असेल. अशा मोबाईल टॉवरच्या स्थापनेसाठी जास्तीत जास्त स्वीकार्य क्षेत्राच्या ५% पेक्षा जास्त किंवा १०० चौ.मी. पेक्षा कमी नसावे, यां पैकी जे कमी आहे ते असेल, आणि आरक्षित जागेच्या एका कोपऱ्यात असेल, या अटींच्या अधीन राहून.

ड) सर्व विकास योजना किंवा प्रादेशिक योजना मध्ये (शाळा, महाविद्यालये आणि रुग्णालयांच्या इमारती वगळता) सर्व बांधकाम करण्यायोग्य आरक्षणे, जेथे अशी स्थापना छतावर करण्यास परवानगी असेल, परंतु केवळ आरक्षणाचा विकास पुर्ण झाल्यानंतरच.

ई) झोपडपट्टी क्षेत्रासाठी विद्यमान विकास नियंत्रण नियमांनुसार तसेच केंद्र शासनाच्या मोबाईल टॉवर संदर्भात मागदर्शक सुचनेनुसार झोपडपट्टी क्षेत्रात मोबाईल टॉवर्स उभारण्यासाठी लागू असतील

फ) राज्य सरकार, शहरी व ग्रामीण स्थानिक संस्था, राज्य सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि राज्य सरकारच्या इतर एजन्सीजच्या मालकीच्या इमारती.

३) राज्य शासनाचे सर्व विभाग, शहरी आणि ग्रामीण स्थानिक संस्था, राज्य सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि राज्य सरकारच्या इतर एजन्सीज दोन महिन्यांच्या आत, ज्या इमारतीं व संरचनांवर मोबाईल टॉवर्सची स्थापना करता येईल अशा इमारती व संरचनांची यादी प्रकाशित करतील. याच प्रकारे मायक्रो सेल्सची उभारणी करता येईल अशा इमारती व संरचनांचीही यादी प्रकाशित करतील. ज्या इमारती / संरचनांवर मोबाईल टॉवर उभारण्यात येऊ नये असा दृष्टिकोण संबंधित विभाग /संस्था /एजन्सी याचा असेल त्यांनी कारण नमुद करून अशा इमारती/संरचना यांची यादी माहिती तंत्रज्ञान विभागास सादर करावी. ज्या अर्जदारास यादी अंतर्गत कोणत्याही इमारती/संरचनेवर मोबाईल टॉवर / मायक्रो सेल ची उभारणी करावयाची असेल त्यास इमारत / संरचनेच्या मालकाची (शासकीय विभाग / संबंधित प्राधिकरण) पुन्हा परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही. तथापि, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या विद्यमान धोरणानुसार आवश्यक त्या परवानग्या / नाहरकत घेणे आवश्यक राहील.

४) खाजगी इमारती / संरचना / जागांवर मोबाईल टॉवर उभारणीच्या तरतूदी केंद्र शासनाच्या दि. ०१.०८.२०13 रोजीच्या तरतूदीशी अनुरूप असतील.

५) दुरसंचाराच्या पायाभूत सुविधा उभारणी व देखभालीसाठी प्राप्त अर्जावर निर्णय घेण्यासाठी सर्व विभाग व प्राधिकरणे मिळून जास्तित जास्त ३० दिवसांची कालमर्यादा असेल. अर्जावर निर्णय ३० दिवसांत कळविण्यात आले नाही तर परवानगी दिली आहे असे विचारात घेतले जाईल.

६) प्रशासकीय शुल्काची रक्कम रु १०००० प्रति मोबाइल टॉवर / मायक्रो सेल एवढी असेल. प्रधान सचिव माहिती तंत्रज्ञान) यांच्या अध्यक्षतेखाली सचिव नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व वन विभाग यांचा समावेश असलेल्या समितीस प्रशासकीय शुल्काच्या रकमेत वेळोवेळी सुधारणा करण्याचे अधिकार असतील.

७) मोबाइल टॉवरच्या उभारणीसाठी दिलेल्या परवानगीची वैधता परवानगीच्या तारखेपासून पुढील ५ वर्षासाठी राहील, ज्यानंतर दूरसंचार सेवा प्रदाता परवानगी नूतनीकरणासाठी अर्ज करू शकेल.

८) इलेक्ट्रोमॅग्नेटीक उत्सर्जन व विकिरण ची मर्यादा पाळण्याबाबत भारत सरकारने वेळोवेळी दिलेल्या दिशानिर्देशांचे पालन करण्याची जबाबदारी सर्व दुरसंचार संस्थांना तसेच अर्जदारांना लागू असेल.

९) नगर विकास/ ग्राम विकास विभागाने मोबाइल टॉवर उभारणीच्या परवानगीसाठी अर्जासोबत सादर करावयाचे अभिलेख व कार्यपद्धती बाबत त्यांच्या अधिनस्त नागरी/ ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्या.

**ब. मार्गाचा हक्क धोरण (ROW Policy)**

१). दुरसंचाराच्या पायाभूत सुविधा उभारणी, ऑप्टीकल फायबर केबल जाळे उभारणी व देखभालीसाठी प्राप्त अर्जावर निर्णय घेण्यासाठी सर्व विभाग व प्राधिकरणे मिळून जास्तित जास्त ३० दिवसांची कालमर्यादा असेल.

२) अर्जावर निर्णय ३० दिवसांत कळविण्यात आले नाही तर परवानगी दिली आहे असे विचारात घेतले जाईल.

३) दुरसंचार / इंटरनेट सेवा पुरविण्यासाठी भारत सरकारच्या दूरसंसचार विभागाकडील विहित परवाना प्राप्त केलेल्या संस्थांनी राज्याचे महामार्ग / रस्ते यांच्या बाजूने, राज्याच्या जमिनीतून, नेटवर्क घालण्यासाठी परवाना / मार्गाचा हक्कासाठी अर्जाबरोबर सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी परिशीष्ट “अ” मध्ये दर्शविण्यात आली आहे.

४) ग्रामीण, नगर परीषद व महानगरपालिका क्षेत्रात नेटवर्क उभारण्याबाबत परवानगी देणारी सक्षम प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील:-

अ) सिडको, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ इ. बाबत संबंधित प्राधिकरणाचे स्थानिक कार्यकारी प्रमुख परवानगी देतील.

ब) राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूची जमीन बाबत संबंधित मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग परवानगी देतील.

क) द्रुतगती महामार्ग, राज्यमार्ग, प्रमुख राज्यमार्ग, राज्य क्षेत्राकडील प्रमुख जिल्हामार्ग व इतर जिल्हामार्ग यांबाबत संबंधित मुख्य अभियंता, सां.बां.वि., महाराष्ट्र शासन परवानगी देतील.

ड) स्थानिक क्षेत्राकडील प्रमुख जिल्हामार्ग, इतर जिल्हामार्ग व ग्रामीण मार्ग याबाबत संबंधित जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी परवानगी देतील.

इ) वन जमिनीबाबत प्रधान वनसंरक्षक, नागपूर व राष्ट्रीय महामार्गाबाबत केंद्र शासनाच्या वतीने संबंधित मुख्य अभियंता, सा.बां.वि.परवानगी देतील.

५) खाजगी जमिनीमधून जाणाऱ्या नेटवर्कच्या बाबतीत, संबंधित महसूल अधिकाऱ्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४९ अनुसार कार्यवाही करावी.

६) वन जमिनीमधून जाणाऱ्या नेटवर्कच्या बाबतीत, प्रधान मुख्य वनसंरक्षकाने महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एफएलडी १०००/सीआर३०१/एफ-१०, दि. १६ ऑक्टोबर, २००१ व भारत सरकारचे पत्र क्र. ११-९/९८/एफसी, दि. १६ ऑक्टोबर, २००० या अन्वये कार्यवाही करावी.

७) परिच्छेद ४ येथे नमुद केलेली सक्षम प्राधिकरणे, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत तपशीलवार मार्ग नकाशाला मान्यता देतील. नेटवर्क टाकण्याचे काम ज्या मार्गाने करता येईल असा एखादा पर्यायी मार्ग सुचविण्यास सदर प्राधिकरण सक्षम असेल. नेटवर्कची जागा आणि /किंवा पुनर्भरण करून पुन:स्थापना करण्याची पध्दती, यामध्ये सक्षम प्राधिकाऱ्यास योग्य ते बदल सूचवता येतील. त्यानंतर संयुक्तरित्या स्वाक्षरी करतील.

८) परिच्छेद ४ येथे नमुद केलेली सक्षम प्राधिकरणे, रस्त्यांचे वारंवार होणारे खोदकाम टाळण्यासाठी महामार्ग / रस्ते बांधतांना किंवा सुधारणा करतांना त्यांच्या बाजूने किंवा त्यांना छेदून डक्टस / कंन्डुट (Ducts / Conduits) यांच्या मधून केबल टाकण्यास आदेश देऊ शकतील.

९) परवानगी मंजूर होण्यापुर्वी अर्जदारास प्रशासकीय शुल्क व पुनर्भरण शुल्काचा भरणा ऑनलाईन करणे बंधनकारक असेल. पुनर्भरण शुल्काची आकारणी मार्गाच्या प्रकारानुसार (डांबरी रस्ता, कॉन्क्रीट रस्ता, बैलगाडी रस्ता, पायवाट) व तांत्रिक विनिर्देशानुसार संबंधित प्राधिकरण करेल.

१०) ऑप्टिक फाइबर टाकण्यासाठी इशारात्मक वार्षिक कृती योजना सर्व दूरसंचार सेवा प्रदात्यांनी माहिती तंत्रज्ञान विभाग आणि संबंधित नागरी स्थानिक संस्था / स्थानिक संस्था / सक्षम प्राधिकरणे यांच्याकडे प्रती वर्षी ३१ जुलै पर्यंत सादर करावी.

११) विविध भाग धारकांना शुल्कांचे स्वयंचलितपणे हस्तांतरण करण्याची तरतूद या प्रणालित असेल.

१२) प्रशासकीय शुल्काची रक्कम रु १००० प्रति किलोमीटर एवढी असेल. प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान) यांच्या अध्यक्षतेखाली सचिव नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व वन विभाग यांचा समावेश असलेल्या समितीस प्रशासकीय शुल्कात वेळोवेळी सुधारणा करण्याचे अधिकार असतील.

१३) भारत नेट प्रकल्प, राज्य शासनाचे प्रकल्प तसेच भारत सरकारचे प्रकल्प यांना प्रशासकीय शुल्कातून सूट राहील. प्रकल्प अंमलबजावणी संस्था पुनर्भरण शुल्काची अदायगी करेल.

१४) वरील प्रशासकीय शुल्कांव्यतिरिक्त, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी निर्देशित केलेली राज्य शासनाची कार्यालये / स्थानिक प्राधिकरणे यांना २एमबीपीएस क्षमतेची विनामुल्य इंटरनेट सेवा देणे ऑप्टीकल फायबर केबल टाकणाऱ्या/वापरणाऱ्या दुरसंचार सेवा प्रदाता संस्थेस बंधनकारक राहील. (प्रदान केल्याच्या तारखेपासून ३ वर्षांच्या कालावधीसाठी बँडविड्थ मोफत असेल. पुढील २ वर्षांकरिता दरांमध्ये ५०% सूट असेल व त्यानंतर नियमित दर लागू होतील). तथापि, दुरसंचार सेवा प्रदाता संस्थेच्या Aggregation Point पासून १०० मिटरच्या आतील शासनाच्या कार्यालयांना परवानाधारकाने जोडणी देण्याची यास मर्यादा असेल. दूरसंचार सेवा प्रदात्याने शासनाच्या कार्यालयांना द्यावयाच्या जोडण्यांची एकूण संख्या खालीलप्रमाणे असेल -

अ) मुंबई – ४० जोडण्या

आ) नागपूर/पुणे – २५ जोडण्या प्रत्येकी

इ) वरील अ आणि आ व्यतिरिक्त इतर स्थानिक प्राधिकरणे – १५ जोडण्या प्रत्येकी

१५) दुरसंचार प्रदाता संस्थेने १०० मिटरच्या आतील व रस्त्याच्या एकाच बाजूस असलेल्या सर्व कार्यालयांना जोडणी द्यावयाची आहे. जर कार्यालयाचे अंतर १०० मीटरपेक्षा जास्त असेल किंवा संबंधित कार्यालयला जोडणी देण्यासाठी रस्ता ओलांडावा लागणार असेल तर त्या संबंधित कार्यालयास जोडणीसाठी एकवेळ भरावयाच्या अतिरिक्त शुल्काचा भरणा करावा लागेल.

१६) स्थानिक प्राधिकरणे दुरसंचार सेवा प्रदाता संस्थांना कोणतेही कर, फी, सेस किंवा अधिभार लागू करणार नाहीत. प्रशासकीय शुल्कात सर्व शुल्के समाविष्ट असतील. स्थानिक प्राधिकरण / विभागांसोबत प्रशासकीय शुल्काच्या सहभागाचे प्रमाण निश्चित करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयास प्राधिकृत करण्यात येत आहे. किमान ६५% प्रशासकीय शुल्क स्थानिक प्राधिकरण / विभागांना पेमेंट गेटवे, एसएमएस व इमेल गेटवेच्या सहाय्याने अदा करण्यात येईल.

१७) दूरसंचाराच्या पायाभूत सुविधांची उभारणी व देखभालीच्या आवश्यक परवानग्या देण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालय सिंगल विंडो पोर्टलची ऑनलाइन सुविधा उपलब्ध करेल.

अ) परवानगीची आवश्यकता असलेल्या संस्थेस आवश्यक कागदपत्रांसह आणि नकाशांसोबत केवळ पोर्टलच्या माध्यमाने आवश्यक त्या परवानगीसाठी ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक राहील. अर्जदारांनी इंटरऑपरेबल जीआयएस प्लॅटफॉर्मवर आधारित प्रस्तावित इन्फ्रास्ट्रक्चर ॲसेटची तपशीलवार माहिती देणे आवश्यक आहे.

ब) सर्व शुल्कांचा ऑनलाईन भरणा करता येण्याची सुविधा या पोर्टलवर असणे आवश्यक राहील. सर्व शुल्के फक्त या पोर्टलवरूनच स्वीकारली जातील.

क) या पोर्टसाठी आवश्यक लॉगईन आयडी / पासवर्ड माहिती तंत्रज्ञान विभाग अर्जदारास व स्थानिक प्राधिकरणांना उपलब्ध करून देईल.

ड) ऑनलाइन प्रणाली सक्रिय होईपर्यंत, अर्ज हार्ड कॉपी स्वरूपात स्वीकारले जातील .तथापि, या धोरणाच्या इतर सर्व बाबी हे धोरण अंमलात येण्याच्या तारखेपासून लागू होतील.

१८) दुरसंचार पायाभुत सुविधा निर्मीतीचे धोरण राबवितांना निर्माण होणाऱ्या वादाच्या निराकरणासाठी प्रधान सचिव (मातं) हे वाद निवारण अधिकारी असतील.

१९) मंत्रिमंडळाच्या दि. ३१.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१७२२११४१७७११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

S V R
Srinivas

Digitally signed by S V R Srinivas
DN: c=IN, postalCode=400020, st=Maharashtra, 2.5.4.20=31d35fda97cba0c6a6c5e2ca7125fd8ba7f7201a47f0e71dbf230047862bd061, serialNumber=914d8a9c1092ca4b44280033c71560ea75b2d56dcb4d3fc1f81eb6dfc5fcbe63, cn=S V R Srinivas
Date: 2018.03.03 13:32:10 +05'30'

**(एस. व्हि. आर. श्रीनिवास)**
प्रधान सचिव (मातं)
महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय.

२. महसूल मंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय.
३. राज्य महसूल मंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय.
४. मुख्य सचिव, मंत्रालय.
५. प्रधान सचिव उद्योग, मंत्रालय.
६. प्रधान सचिव नगर विकास, मंत्रालय.
७. सचिव ग्रामविकास, मंत्रालय.
८. सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय.
९. इतर सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

प्रत योग्य कार्यवाहीसाठी

१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. सर्व जिल्हाधिकारी.
१२. जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. सर्व आयुक्त, महानगरपालिका.
१४. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगर पंचायत.
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.
१७. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती
१८. मुख्य अभियंता, राष्टीय महामार्ग, कोंकण भवन, नवी मुंबई.
१९. व्यवस्थापकीय संचालक, सिडको.
२०. प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर.

परिशीष्ट अ

ऑप्टीकल फायबर च्या मार्गाच्या हक्क परवानगीसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी -

१. दुरसंचार विभाग, भारत सरकार यांच्याकडून मिळालेल्या लायसन्सची प्रत,
२. प्रस्तावित नेटवर्कच्या मार्गाचा नकाशा, लांबी व जमिनींच्या मालकीचा तपशील.